


दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक



● वर्ष : ०२ ● अंक : ९९ ● पुणे ● मंगळवार, दि. २५ फेब्रुवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

## ठळक बातम्या

### १८ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत

राजगुरुनगर (आरंभ पर्व) : खेड तालुक्यातील १८ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत येत्या गुरुवारी (दि. २७) पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात होणार असल्याची माहिती तहसीलदार ज्योती देवरे यांनी दिली. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार ५ मार्च २०२० च्या अधिसूचनेद्वारे ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी फेरआरक्षण निश्चित करणे आवश्यक असल्याने दि. १ जानेवारी २०२४ ते ४ मार्च २०२५ या कालावधीत मुदत संपणा-या राज्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडत निश्चित करण्याचे निर्देश ग्रामविकास मंत्रालयाने दिले आहेत. यानुसार पुणे जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग, महिला राखीव यातील महिलांसह आरक्षण काढण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर तालुकानिहाय होणारी सरपंच आरक्षण सोडत निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात होणार आहे. यामध्ये खेड तालुक्यातील खराबवाडी, जऊळके खुर्द, कोहींडे बुद्रुक, सोळू, वडगाव घेनंद, धामणे, गुळाणी, रौंधळवाडी, आसखेड बुद्रुक, आंबेठाण, वाशेरे, सायगाव, कडाचीवाडी, बोरदरा, पाईट, कोये, खालुंब्रे, टेकवडी या ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत होणार आहे.

### परळीला ५६४ कोटींचा निधी मंजूर

बीड (आरंभ पर्व) : राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा कृषीमंत्री धनंजय मुंडे हे बुधवारच्या मंत्रिमंडळ बैठकीला गैरहजर होते. मागच्या दोन महिन्यांपासून धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. असं असतानाही धनंजय मुंडेंच्या परळी मतदारसंघामध्ये मंत्रिमंडळ बैठकीत भरभरून निधीला मंजुरी देण्यात आलेली आहे.

### भारताबाबत जग आशावादी : मोदी

भोपाळ (आरंभ पर्व) : "पर्यावरण, अपारंपरिक ऊर्जा यासह विविध क्षेत्रातील कामगिरीबाबत जग भारताबाबत प्रचंड आशावादी आहे. जगभरातील सामान्य व्यक्ती असो, धोरणकर्ते, विविध देशांतील तज्ज्ञ किंवा संस्था असो, या सर्वांना खूप आशा आहेत आणि त्यांना आपल्याबाबत एवढी उत्सुकता असण्याची इतिहासातील पहिलीच वेळ असावी, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.' इन्वेस्ट मध्य प्रदेश-ग्लोबल इन्वेस्टर्स समिट-२०२५' चे उद्घाटन करताना ते बोलत होते. या परिषदेचा उद्देश व्यापक प्रमाणात गुंतवणुकीचा ओघ वाढविण्याचा आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले, भविष्यात वस्र, पर्यावरण, पर्यटन आणि तंत्रज्ञानाच्या सेक्टरमध्ये कोट्यावधी रोजगार उपलब्ध होतील. 'विकसित'कडे वाटचाल करणाऱ्या भारताबाबत संपूर्ण जग आशेने पाहत असून इतिहासात कदाचित पहिलीच वेळ असेल. मागील काही आठवड्यात भारताबाबत जागतिक पातळीवर मांडले जाणारे मत आशावादी आहे आणि ते गुंतवणूकदारांचा उत्साह वाढविणारे आहे. काही दिवसांपूर्वीच जागतिक बँकेने भारत हा आगामी काळात वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेचा देश असल्याचे मत मांडले. संयुक्त राष्ट्राच्या एका संस्थेने हवामान बदलाच्या मुद्यावर भारताला सौर ऊर्जेचे सुपरपॉवर असल्याचे म्हटले होते.

# पाकिस्तान, बांगलादेशचा पत्ता कट

## चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सेमीफायनलमध्ये पोहोचले भारत आणि न्यूझीलंड

**दुबई (दै. आरंभ पर्व)**

रोहित शर्माच्या नेतृत्वातील टीम इंडियाने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५च्या सेमीफायनलमध्ये एंट्री घेतली आहे. सोबतच ग्रुप एमध्ये सेमीफायनलमध्ये पोहोचणारा दुसरा संघ न्यूझीलंड ठरला आहे. तर या ग्रुपमधील यजमान पाकिस्तान आणि बांगलादेशचा पत्ता मात्र कट झालाय.

ग्रुप ए मधून भारत आणि न्यूझीलंड हे संघ सेमीफायनलमध्ये पोहोचण्याचा निर्णय सोमवारी झाला. या दिवशी रावळपिंडीमध्ये न्यूझीलंड आणि बांग्लादेश यांच्यात करो वा मरोचा सामना खेळवण्यात आला. या सामन्यात न्यूझीलंड संघाने ५ विकेटनी विजय मिळवला.

**विराट वादळात पाकिस्तान उद्ध्वस्त - संपादकीय**

या निकालासह भारतीय संघ आणि न्यूझीलंडचे संघ फायनलमध्ये पोहोचण्याचा निर्णय झाला आहे. खरंतर, या दोन्ही संघांनी आतापर्यंत आपल्या ग्रुपमधील २-२ सामने खेळले आहेत. दोन्ही सामन्यात या संघांनी विजय मिळवला. दुसरीकडे पाकिस्तान आणि बांगलादेशचे संघ आहेत. या दोन्ही संघानी प्रत्येकी दोन सामने खेळले आणि दोन्ही सामन्यात पराभव स्वीकारला.

या पद्धतीने पॉईंट्सच्या आधारावर पाकिस्तान आणि बांगलादेशचा संघ चॅम्पियन्स ट्रॉफीमधून बाहेर झाले आहेत. तर भारतीय संघ आणि न्यूझीलंड संघाने सेमीफायनलमध्ये प्रवेश मिळवला आहे. भारतीय संघाने आपल्या पहिल्या सामन्यात बांगलादेशला ६ विकेटनी हरवले. यानंतर पाकिस्तानलाही ६ विकेटनी हरवले होते.

ग्रुप एमध्ये आणखी दोन सामने खेळवले जातील. हे सामने औपचारिक असतील. या ग्रुपमधील पुढील सामना पाकिस्तान आणि बांग्लादेश यांच्यातील असेल. २७ फेब्रुवारीला हा सामना रंगेल. तर ग्रुपमधील शेवटचा सामना भारतीय संघ आणि न्यूझीलंड यांच्यात असेल.



# कारखाना चालू करण्यासाठी जमीन विक्री हा पर्याय

**सुभाष जगताप**



**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

गेली चौदा वर्ष बंद राहून कर्जबाजारी झालेल्या थेऊर (ता. हवेली) येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याची ९९.२७ एकर जमीन विक्री करण्याचा पर्याय असुन तरच कारखाना चालू होऊ शकतो असे मत यशवंत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुभाष जगताप यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. दिनांक २६/०२/२०२५ रोजी कारखान्याची सर्वसाधारण सभा वृंदावन पॅलेस थेऊर रोड येथे होणार असुन संचालक मंडळाचे म्हणणे मांडण्यासाठी पत्रकार परिषदेत जगताप यांनी खुलासा केला. कारखान्यावर एकूण ३०० कोटी रुपयांची विविध देणणी असून जर बँकांची ओटीएस केली तर ११२कोटी रुपये कारखान्याचे वाचणार आहेत. कारखान्याच्या जमिनीचा १२ वेळा लिलाव होऊन सुद्धा ही जमीन विक्री झाली नाही .त्यामुळे हवेली तालुक्यातीलच दुसरी मोठी संस्था पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीला देण्याचा प्रस्ताव कारखान्याने दिला आहे .तसेच येणाऱ्या २६ तारखेला सर्वसाधारण सभेत तशी परवानगी सभासदांची घेण्यासाठी ही सभा घेण्यात येणार आहे. संचालक मंडळ निवडून आल्यापासून विविध पर्याय तपासून बघितले परंतु त्यातून मार्ग निघाला नसून ९९.२७ एकर जमीन विकल्याशिवाय दुसरा पर्याय नाही . असे जगताप यांनी सांगितले यावेळी व्हाईस चेअरमन किशोर उंद्रे व संचालक मंडळ उपस्थित होते. आधीच्या संचालक मंडळाने २०६ एकर जमीन गहाण ठेवली आहे तर ११७एकर जमीन विकण्याचा तसा त्यांचा प्रस्ताव होता . परंतु आत्ताच्या संचालक मंडळांनी ९९.२७ एकर जमीन विक्रीचा प्राथमिक स्वरूपाचा प्रस्ताव कृषी उत्पन्न बाजार समितीला दिला आहे आणि या दोन संस्था अण्णासाहेब मगर यांनी स्थापन केल्या असल्यामुळे जमीन बाजार समितीला देण्यासाठी व सभासदांची परवानगी घेण्यासाठी ही सभा ही सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे असे जगताप यांनी सांगितले .

**सभेस वारसांना परवानगी नाही :** यशवंत सहकारी साखर कारखान्याची सर्वसाधारण सभेमध्ये यशवंतच्या सभासदांच्या वारसांना सभेस बसण्यासाठी परवानगी दिली जाणार नसल्याची माहिती चेअरमन सुभाष जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना शुभाष जगताप यांनी सांगितले की वारस नोंदीचा विषय अजून पूर्ण झालेला नाही तशी त्याची प्रक्रिया चालू असून लवकरच तो विषय मार्गी लागेल. परंतु २६तारखेच्या होणाऱ्या सर्वसाधारण सभेच्या जागी फक्त सभासदांनाच प्रवेश मिळणार असून त्यांच्या वारसांना प्रवेश नाकारण्यात येणार असल्याचे जगताप यांनी सांगितले.

# 'पुष्पा'चा शालेय विद्यार्थ्यांवर वाईट प्रभाव : शिक्षिकेची तक्रार

**हैदराबाद (दै. आरंभ पर्व)**

दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २ : द रुल' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. मात्र हैदराबादमधील युसुफगुडा इथल्या एका सरकारी शाळेतील शिक्षक चित्रपटावर नाराज आहेत. हैदराबादमधील एका सरकारी शाळेतील शिक्षकाने विद्यार्थ्यांवर 'पुष्पा'चा वाईट प्रभाव पडत असल्याचे म्हटले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, 'शाळेतली मुलं विचित्र हेअरस्टाइल करतात, अश्लील बोलतात. आपण फक्त शिक्षणावर लक्ष केंद्रीत करतोय आणि याकडे दुर्लक्ष करतोय. ही परिस्थिती केवळ सरकारी शाळांमध्येच नाही तर खाजगी शाळांमध्येही आहे. प्रशासक म्हणून मला असं वाटतं की मी अपयशी ठरत आहे', अशी तक्रार शिक्षिकेने बोलून दाखवली आहे. विद्यार्थ्यांना शिक्षा केल्याने त्यांच्यावर दबाव येऊ शकते, असेही त्यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर 'आम्ही त्यांच्या पालकांना या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी बोलावलं तरीही त्यांना काही वाटत नाही. तुम्ही त्यांनी शिक्षादेखील करू शकत नाही, कारण त्यामुळे ते आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. त्यामुळे या सर्व गोष्टींचा दोष मी मास मीडियाला देते. पुष्पासारख्या चित्रपटामुळे माझ्या शाळेतील अर्धे विद्यार्थी आणखी बिघडले आहेत. शाळेतल्या विद्यार्थ्यांवर काय परिणाम होईल याचा कोणताही विचार न करता सेन्सॉर बोर्डाने चित्रपटाला प्रमाणपत्र दिलं आहे', अशी टीका संबंधित शिक्षिकेने केली आहे.












# विराट वादळात पाकिस्तान उद्ध्वस्त

क्रिकेट हा भारतात धर्म मानला जातो आणि क्रिकेट खेळाडू ज्यात सचिन तेंडुलकर असतो त्यांना डेमी गॉड्स मानले जातात. दुबईच्या आंतरराष्ट्रीय मैदानावर झालेल्या भारत विरुद्ध पाक सामन्यात टीम इंडियाने यजमान पाकिस्तानचा धुव्वा उडवला आणि दणदणीत विजय संपादन केला. विराट कोहलीची शतकी दणदणीत खेळी आणि गोलंदाजांनी त्याला दिलेली तोलामोलाची साथ यांच्या जोरावर भारताने सामना जिंकला. पाकिस्तानने दिलेले २४२ धावांचे आव्हान भारताने सहज पार केले आणि या बहुप्रतीक्षित सामन्यात विजय प्राप्त केला. आधी भारतीय गोलंदाजांनी पाकिस्तानी फलंदाजीचे कंबरडे मोडले आणि नंतर विराट कोहलीच्या शतक आणि श्रेयस अय्यरच्या अर्धशतकी खेळीच्या जोरावर पाकिस्तानला पुन्हा एकदा धूळ चारली आणि चॅम्पियन ट्रॉफी सामन्यात पाकिस्तावर विजय नोंदवला. या पराभवाबरोबरच पाकिस्तावर स्पर्धेतून बाहेर होण्याची नामुष्की आली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामन्यांचा इतिहास अत्यंत कडवटपणाचा आणिबिघडलेल्या संबंधांचा आहे. फाळणीनंतर भारताला ज्या जखमा झाल्या त्यांची पार्श्वभूमी या क्रिकेटविषयक संबंधांना आहेच. पण क्रिकेट सामने भारत आणि पाकिस्तान यांच्यात प्रथम १९५२ मध्ये कसोटी आणि १९७९ मध्ये एकदिवसीय क्रिकेट सामने सुरू झाले.

पाकिस्तानने भारतीयांवर दहशतवादी हल्ले केले आणि त्यात कित्येक भारतीय लोक मारले गेले. त्यानंतर उभय देशांनी क्रिकेट बंद करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आता तिसऱ्या देशाच्या भूमीवरच या दोन्ही देशात क्रिकेट खेळले जाते. हा इतिहास सर्वांना माहीत आहे. पण कालच्या हाय व्होल्टेज ड्रामामध्ये असे दिसले की, टीव्ही फुटले नाहीत आणि मारामाऱ्या झाल्या नाहीत. दोन्ही देशांत क्रिकेट हा अत्यंत लोकप्रिय खेळ असला तरीही दोन्ही देशांनी क्रिकेट खेळणे बंद केले असल्याने त्यांच्यात संघर्ष उद्भवत नाही. पण आंतरराष्ट्रीय मैदानावर दोन देशांतील सामना असेल तेथे दोन्ही देशांचे नागरिक उपस्थित राहून आपापल्या संघांना बॅकअप करत असतात. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामने




खेळले जात नसले तरीही त्यांच्यात यापूर्वी तीन युद्धे झाली आहेत. त्यात भारताचा विजय झाला आहे. त्या कडवटपणाचे प्रात्यक्षिक पाकिस्तानच्या कृत्यातून नेहमीच दिसते. या पार्श्वभूमीवर क्रिकेट सामना हा खेळ न पाहता त्याकडे युद्ध म्हणून पाहिले जाते आणि त्या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तानला नमवले ही कोट्यवधी भारतीयांच्या दृष्टीने अत्यंत समाधानाची बाब आहे. क्रिकेट हा खेळ भारतात अत्यंत चवीने पाहिला जातो आणि त्यावर चर्चा केली जाते. त्यात भारत आणि पाकिस्तान या दोन देशांतील सामना असला की, त्याला आगळीच धार येते. युद्धांच्या पार्श्वभूमीवर आणि पाकिस्तानच्या मांडीवर बसून दहशतवादी कारवाया करणाऱ्या दहशतवादी संघटनांच्या कृत्यांमुळे या दोन देशांतील सामन्यांना चांगलीच धार येते. तेच कालही घडले. या दोन देशांतील सामने नेहमीच अत्यंत हाय व्होल्टेज आणि रोमांचपूर्ण झाले आहेत. कालचा सामनाही त्यास अपवाद नव्हता.

भारताच्या दृष्टीने एक चांगली बाब घडली आणि ती म्हणजे विराट कोहली पुन्हा फॉर्मात परतला. विराट कोहली, रोहित शर्मा हे त्यांच्या कारकिर्दीच्या उतरत्या टप्प्यात आहेत. त्यातच विराटने आपला फॉर्म पुन्हा परतल्याची दिलेली ग्वाही दिलासा देणारी आहे. विराट कोहली बॅड पॅचमधून बाहेर आला आहे. ही भारतासाठी अत्यंत दिलासादायक बाब आहे. विराटच्या नावावर अनेक विक्रम नोंदवले गेले आणि त्यात आहे १४००० धावा सर्वात वेगात पूर्ण करण्याच विक्रम आणि १५८ झेल. त्याची आकडेवारी ही त्याची महानता सिद्ध करते. त्याने हे रेकॉर्ड केले ते पाकिस्ताच्या संघाविरोधात ही अत्यंत चांगली बाब आहे. विराट कोहली त्याच्या बॅड पॅचमधून बाहेर आला आणि पाकिस्तानला चॅम्पियन ट्रॉफीमधून बाहेर फेकण्याचा मार्ग मोकळा झाला. या बरोबरच विराटने ५१ वे एकदिवसीय शतकही झळकावले.

खरे तर हा सामना एकतर्फीच झाला असे म्हणावे लागेल. कारण या सामन्यात पाकिस्ताने झुंज अशी ती दिलीच नाही. पाकिस्तानच्या खेळाच्या खाणाखुणाही दिसल्या नाहीत. विराटच्या शतकाच्या जोरावर आणि श्रेयस अय्यरच्या शानदार अर्धशतकाच्या जोरावर भारताने विजय मिळवला आणि भारताच्या गोलंदाजांनी उर्वरित काम पूर्ण केले. यावेळी ४७ कोटी प्रेक्षक सामन्याचा आनंद लुटण्यासाठी होते आणि त्यातील भारतीयच जास्त होते हे सांगायला नकोच.प्रत्येक क्षणाला वाढत असलेली भारतीयांची संख्या भारताच्या फलंदाजीपर्यंत ४७ कोटी झाली होती. यावरून या सामन्याच्या लोकप्रियतेचा अंदाज यावा. त्यातही पाकिस्तानसारखा आर्क रायव्हल असला, तर ती लोकप्रियता उच्च कोटीवर पोहोचते याचे प्रात्यक्षिक पुन्हा पाहायला मिळाले. भारत आणि पाक यांच्यातील सामन्याचे महत्त्व नेहमीच आगळे असते. पण यावेळी काल सर्वत्र या सामन्याची चर्चा जास्त सुरू होती. कारण इतका हाय व्होल्टेज सामना दोन्ही देशांतील प्रेक्षकांना फारच कमी वेळा पाहायला मिळतो. पाकिस्तान आता भारताच्या तुलनेत काहीच नाही. त्याची आर्थिक आणि लष्करी ताकद संपली आहे आणि पाकिस्तानची आर्थिक दशा तर अत्यंत दयनीय झाली आहे. तरीही केवळ भारताला टक्कर देऊ म्हणून भारतासमोर उभे राहाण्याचे धाडस हा चिमुकला देश करतो आहे. पण भारताने त्याला युद्धात आणि क्रिकेटच्या मैदानातही अनेक वेळा मात दिली आहे आणि नुकतेच त्याचे प्रत्यंतर आले. भारत-पाक यांच्यातील सामन्याची क्रेझ इतकी प्रचंड आहे की, सामन्याच्या आदल्या दिवशी लोक चौपट किंमत देऊन तिकिटे खरेदी करण्यास तयार होते. अर्थात त्यात यश आले नाही. पण भारत आणि पाक यांच्यात सामना कुठेही असो आणि तो जर क्रिकेटचा असेल, तर हमखास गल्ला भरतो अशी ख्याती पसरली आहे. त्याला अपवाद रविवारीही झाला नाही. क्रिकेट म्हणून या सामन्याला कितपत महत्त्व द्यायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. पण भारतीय प्रेक्षकांना एक छान सामना पाहायला मिळाला.

# सिंहगड किल्ल्यावर एनएसएस विभागाच्यावतीने गड स्वच्छता व पुनर्स्थापना मोहीम

**लक्ष्मण साबळे**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आरएमडी सिंहगड टेक्निकल इन्स्टिट्यूट कॅम्पस, वारजे यांच्या एनएसएस विभागाच्या वतीने दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ रोजी सिंहगड किल्ल्यावर गड स्वच्छता व पुनर्स्थापना मोहिमेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात एनएसएस स्वयंसेवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला आणि किल्ल्याच्या स्वच्छता व पुनर्स्थापनेसाठी मेहनत घेतली. ही मोहीम एनएसएस कार्यक्रम अधिकारी श्री. ज्ञानेश्वर घुगे यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पडली. त्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन, समन्वय आणि मार्गदर्शन केले. एनएसएसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणे, ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी पुढाकार घेण्यास प्रवृत्त करणे आणि देशासाठी योगदान देण्याची प्रेरणा देणे हा अशा प्रकारच्या उपक्रमांचा उद्देश असतो असे मत व्यक्त केले. प्रो. अश्विनी दुधमल यांनी मोहिमेत स्वतः सक्रिय सहभाग घेत स्वयंसेवकांना गड संवर्धनाच्या तंत्रासोबतच ऐतिहासिक स्थळांच्या संरक्षणाविषयी जागरूक राहण्याचे महत्व पटवून दिले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

या मोहिमेसाठी श्री. अविनाश जाधव (गड किल्ले संवर्धन सेल पुणे जिल्हा अध्यक्ष ), श्री. अमित नागपुरे ( गड किल्ले संवर्धन सेल हवेली तालुका अध्यक्ष ) आणि रोहन कुमार यांचे कार्यक्रमाला मोलाचे सहकार्य लाभले. यांनी सिंहगड किल्ल्याचा इतिहास, गडसंवर्धनाचे तंत्र, तसेच किल्ल्याच्या मूळ रचनेच्या जतनाविषयी सखोल मार्गदर्शन केले. तसेच श्री. अविनाश जाधव यांनी विद्यार्थ्यांना गड संवर्धनाचे भविष्यातील परिणाम, पर्यावरणपूरक उपक्रमांचे महत्त्व आणि नव्या पिढीवर त्याचा होणारा सकारात्मक प्रभाव यावर सविस्तर माहिती दिली.

आर. एम. डी. सिंहगड इन्स्टिट्यूट चे प्राचार्यप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. दीक्षित यांनी विद्यार्थ्यांच्या सामाजिक कार्यावरील जाणिवेचे कौतुक केले आणि भविष्यातही असे उपक्रम राबवावेत, यासाठी प्रोत्साहित केले. विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन देशाच्या ऐतिहासिक वारशाचे जतन करणे आणि सामाजिक जाणीव जागृत करणे हे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच डॉ. स्वाती विजय (डीन एमबीए) यांनी एनएसएस स्वयंसेवकांना सातत्यपूर्ण पाठिंबा दिला. त्यांच्या प्रोत्साहनामुळे विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून मोठ्या आत्मीयतेने या उपक्रमात सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये डॉ. देवयानी इंगळे आणि सौ. नीता शिंदे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांची संपूर्ण नियोजनात्मक मदत आणि स्वयंसेवकांना दिलेले सततचे मार्गदर्शन यामुळे हा उपक्रम सुचारू पार पडला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रो. अश्विनी दूधमल यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले.




# बहुजन समाज पार्टी, फकीरा दलतर्फे शिवजयंती उत्साहात साजरी!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

धायरी, विजयनगर येथे बहुजन समाज पार्टी, फकिरा दल यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली.

बसपा प्रदेश सचिव हुलगेश चलवादी,जिल्हा प्रभारी अशोक गायकवाड, व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले. व शिव वंदना घेण्यात आली.

यावेळी पुणे शहर पोलीस वाद्यपथक यांचे दर्जेदार संचलन पार पडले. या कार्यक्रमाचे आयोजन पुणे शहर प्रभारी गोल्डमॅन अरुण अण्णा गायकवाड यांनी केले.

याप्रसंगी बोलताना हुलगेश चलवादी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आपण सर्वांनी आत्मसात केले पाहिजे . सर्व जाती धर्माला सोबत घेऊन आपल्या हक्कासाठी लढायला पाहिजे. असे आवाहन केले.

येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीमध्ये बहुजन समाज पार्टी मोठा विजय मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अरुण अण्णा गायकवाड यांनी पक्षाचे चांगल्या प्रकारे काम केले आहे त्यामुळे निश्चितपणे आगामी महानगरपालिका निवडणुकीमध्ये ते नगरसेवक होतील अशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी प्रदेश महासचिव हुलगेश चलवादी,जिल्हा प्रभारी अशोक गायकवाड किशोर ढवळे माजी नगरसेवक भाई जगताप, पंडितराव पाटील, बिल्डर लक्ष्मणराव खंडागळे, युवा कार्यकर्ते सनी डाडर,परमेश्वर गायकवाड, सुनीता कांबळे शांता कांबळे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाग्यश्री बँड पथक, शहर पोलीस वाद्यपदक यांच्या संयुक्त विद्यमाने ही मिरवणूक पार पडली. यावेळी बोलताना अरुण अण्णा गायकवाड यांनी पक्षाने दाखवलेल्या विश्वासास पात्र राहून चांगली कामगिरी करेन असा विश्वास व्यक्त केला. विजयनगर ते वडगाव अशी रॅली काढून ही शिवजयंती साजरी झाली.

राष्ट्रसेवा समूह, राष्ट्रवादी कॉंग्रेसतर्फे

# सिंहगडावर छत्रपती राजाराम महाराज यांची जयंती साजरी

**लक्ष्मण साबळे**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

२४ फेब्रुवारी स्वराज्याचे तिसर छत्रपती शिवपुत्र छत्रपती राजाराम महाराज यांची किल्ले सिंहगड येथे उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. राष्ट्रसेवा समूहाच्या वतीने आयोजित

शिवजयंती उत्सवाची सांगता ही छत्रपती राजाराम महाराज जयंती दिनी सिंहगडावर झाली.यावेळी महिलांच्या हस्ते गडपूजन करण्यात आले.

नरवीर तानाजी मालुसरे आणि छत्रपती राजाराम महाराज यांच्या समाधी स्थळी विधिवत पूजा करण्यात आली.जिजाऊ वंदना आणि जयघोष करण्यात आला.

अनेकांनी आपली मनोगते व्यक्त केली.यावेळी राष्ट्रवादीचे प्रवक्ते राहुल पोकळे,विजय हगवणे,स्मिता पोकळे,अविनाश लगड,रमेश करंजावणे,विकास हगवणे,संजय पोकळे,बाबुराव पोकळे,विद्याधर थोपटे,मोगल जाधव,बाळासाहेब सुर्वे, समीर चिंधे, कृष्णा बेलदरे,अतुल पवार, साई सांगळे,अंकिता जाधव,ज्योती कुंभार,गौरी कुंभार,भाग्यश्री काळे,सचिन पातूरकर,संजय गवळी,रितेश जोरे,यश कुंभार उपस्थित होते. कार्यक्रमांचे आयोजन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष,राष्ट्रसेवा समूह आणि राजमाता जिजाऊ महिला महासंघ यांनी केले.



# कर्मचाऱ्यांकडून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

**लक्ष्मण साबळे**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगर परिवहन महा एनमंडळ लिमिटेड स्वारगेट आगार या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांना चालक वाहक व इतर कर्मचाऱ्यांकडून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवछत्रपती महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व कर्मचाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. यावेळी स्वारगेट आगाराचे प्रमुख माननीय शैलेंद् नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .

यावेळी कामगार नेते हरीश ओव्हाळ, वाहक तानाजी कांबळे, हंसराज मोहिते, भारत थोरात, प्रशांत कदम इतर कर्मचारी उपस्थित होते.

# थोडक्यात



## संरक्षण खात्यातील ड्रोन ट्रेनरला मिळणार प्रशिक्षण

पुणे (आरंभ पर्व) : केंद्र सरकारच्या कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन ट्रेनिंग स्कूल ( CAATS) ने पुण्यातील पीबीसी एरो हब रिमोट पायलट ट्रेनिंग ऑर्गनायझेशन सोबत सामंजस्य करार केला आहे. त्यानुसार डीजीसीए चे आगामी काळातील ड्रोन उड्डाणावरील प्रमाणपत्र अभ्यास प्रशिक्षण वर्ग पीबीसी मार्फत घेण्यात येणार आहेत. नुकताच कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन ट्रेनिंग स्कूलचे जनरल अभिनय राय व पीबीसी च्या संचालिका अंजली चित्ते यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहते. यावेळी पीबीसी एरो हब चे संचालक प्रणव चित्ते, ब्रिगेडियर शौकीन उपस्थित होते. याविषयी अधिक माहिती देताना पीबीसी एरो हब चे संचालक प्रणव चित्ते यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही ड्रोन प्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत असून अनेक ठिकाणी आम्ही सेवा पुरवत आहोत. आज पर्यंत आम्ही महाराष्ट्र, गुजरात आणि ओडिसा राज्यातील होतकरू महिलांना नमो ड्रोन दीदी उपक्रमा अंतर्गत ड्रोन उडविण्याचे प्रशिक्षण दिलेले आहे. तसेच हजारहून जास्त विद्यार्थ्यांनी आमच्या ट्रेनिंग सेंटर मध्ये ड्रोन विषयक धडे घेतले आहेत. नुकतेच आम्ही ड्रोन उड्डाणावरील अभ्यासक्रमांसाठी कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन स्कूल (CAATS) सोबत सामंजस्य करार केला असून आमच्यासाठी ही खूप मोठी आनंदाची गोष्ट आहे. त्यानुसार डीजीसीए चे आगामी काळातील ड्रोन उड्डाणावरील अभ्यास प्रशिक्षण वर्ग पीबीसी मार्फत घेण्यात येणार आहेत. दरम्यान, आगामी काळात सीमा भागात किंवा सरक्षण विभागात टेहाळणी करण्यासाठी वापरले जाणारे ड्रोन, युद्ध किंवा आक्रमनासाठी वापरले जाणारे, डोळ्यांच्या क्षमते पलीकडे म्हणजे साधारणता ३ ते ५ किमी उंचीवरुन उडान करणारे ड्रोन चालविण्याचे प्रशिक्षण देण्याचा मानस असल्याचे संचालक प्रणव चित्ते यांनी सांगितले.

# प्रयत्नांची पराकाष्ठा, सकारात्मक दृष्टीने यशप्राप्ती

## डॉ. दत्ता कोहिनकर यांचे मत; व्हीलचेअर रेसमधे १०० दिव्यांगांचा सहभाग



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"प्रयत्नांची पराकाष्ठा, मनातील जिद्द आणि सकारात्मक दृष्टी तुम्हाला यशाच्या मार्गावर घेऊन जाते. जीवनात येणाऱ्या संकटाना आत्मविश्वासाने सामोरे जात प्रामाणिक प्रयत्न केल्यास हमखास यश मिळते," असे मत माईंड पॉवर ट्रेनर व लेखक डॉ. दत्ता कोहिनकर यांनी व्यक्त केले. एनेबलर चॅरिटेबल ट्रस्ट आणि 'सक्षम'च्या वतीने प्रथमच व्हीलचेअरवरील दिव्यांग महिला व पुरुष यांच्यासाठी 'व्हीलचेअर रेस'चे आयोजन केले होते.

एस. पी. कॉलेजच्या मैदानावर या स्पर्धा झाल्या. एकूण १०० दिव्यांग बंधू-भगिनींनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धा चार गटात झाल्या. स्पर्धक, पालक मिळून २५० जण उपस्थित होते. स्पर्धेचे संपूर्ण आयोजन सीमा दाबके, अमोल शिनगारे, अशोक बोत्रे, संतोष गायकवाड, सोहेल मुलानी, अभिजित पोवार, निलेश कांबळे, रामा चलवादी, प्रकाश शेलार, कासीम शेख, यांनी केले. अशोक नांगरे, रवींद्र जोशी, प्रशांत पडदे, सेवा चव्हाण, आकाश कासूर्डे यांनी पंच म्हणून काम केले. 'एमआयटी'च्या नेकी क्लबचे सभासदांनी स्वयंसेवक म्हणून काम केले.

सामान्य दिव्यांग पुरुष गटात अण्णासाहेब वाघमारे (प्रथम), दिपक बेंडाले (द्वितीय), युवराज अहिरे (तृतीय), महिला गटात पद्मा परभणे (प्रथम), वैशाली इंगवले (द्वितीय), भाग्यश्री मोरे (तृतीय), दिव्यांग खेळाडू पुरुष गटात सदाशिव शिंदे (प्रथम), रोहन ढमाले (द्वितीय), सोमनाथ जाधव (तृतीय), महिला दिव्यांग खेळाडू गटात भाग्यश्री मझीरे (प्रथम), रेखा पडवळ (द्वितीय) व तृप्ती चोरडिया (तृतीय) यांनी पारितोषिके मिळवली. प्रथम क्रमांकास ५००० रुपये, द्वितीय क्रमांकास ३००० रुपये, तृतीय क्रमांकास २००० रुपये व सर्वांना ट्रॉफी देऊन गौरवण्यात आले. सहभागी सर्व स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन लायन्स क्लबचे माजी प्रांतपाल लायन राजकुमार राठोड यांच्या हस्ते झाले. दिव्यांग विभाग प्रमुख सीमा दाबके, एनेबलर चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष अमोल शिनगारे, अभिजीत शेडगे स्वाती मोहोळ, सुनील पटवर्धन, दिपीका खिंवसरा, दिपक लोया उपस्थित होते. बक्षिस वितरण माजी नगरसेविका मोनिका मोहोळ, संदीप खर्डेकर यांच्या हस्ते झाले. प्रसंगी मुरलीधर कचरे, बाजीराव पारगे, अमित बराटे, उदय जगताप, महेश करंदीकर, केतकी कुलकर्णी, शिवाजी भेगडे उपस्थित होते.

**दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना प्रेरणा देणारे उपक्रम सातत्याने घेतले पाहिजेत, असे लायन राजकुमार राठोड म्हणाले. स्पर्धेत सहभाग घेतला म्हणजे स्पर्धा जिंकल्यासारखी आहे. यश, अपयश येत-जात राहते. त्याचा फार विचार न करता प्रयत्न करावेत, असे मोनिका मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले. स्वतःला दिव्यांग समजून मागे राहू नका. अशा उपक्रमात एकत्र या. तुमच्या चेहऱ्यावरचा आनंद म्हणजेच उपक्रम यशस्वी झाल्याचे समाधान आहे, अशी भावना संदीप खर्डेकर यांनी व्यक्त केली.**

# 'लीड बाय एक्झाम्पलच्या 11व्या पर्वामध्ये उल्लेखनीय अध्यापन पद्धतींची प्रशंसिता

## रायन ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी रायन पिंटो यांच्या हस्ते एज्युनेशनने आयोजित केलेल्या इव्हेण्टचे उद्घाटन करण्यात आले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
विभिन्न शाळांमधील 50 हून अधिक शिक्षकांनी नाविन्यपूर्ण अध्यापन धोरणे व तंत्रे दाखवण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला वार्षिक प्लॅटफॉर्म 'लीड बाय एक्झाम्पलच्या 11व्या पर्वामध्ये वर्गातील अत्याधुनिक अध्यापन पद्धतींना सादर केले. के-12 संस्थांची आघाडीची ऑपरेटर रायन एज्युनेशन सर्विसेस् प्रा. लि.द्वारे आयोजित करण्यात आलेल्या या इव्हेण्टच्या 11व्या पर्वाचा विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तींमध्ये वाढ करण्याचा मनसुबा होता.




देशभरातील शिक्षकांनी शिक्षण परिसंस्थेतील परीक्षकांच्या सन्माननीय पॅनेलसमोर त्यांच्या अद्वितीय अध्यापन पद्धती सादर केल्या, तसेच विविध शहरांमधील त्यांच्या शाळांमध्ये त्यांनी राबवलेल्या वैयक्तिकृत अध्यापन पद्धतींवर चर्चा देखील केली. मुंबई, पुणे, हैदराबाद, बंगळुरू आणि जयपूर येथील शिक्षकांनी विद्यार्थ्यांमधील अध्ययन तफावत ओळखल्या आणि शिक्षणाचे अनुकूल परिणाम वाढवण्यास मदत करणाऱ्या धोरणांवर चर्चा केली.

प्रश्नोत्तरांदरम्यान, परीक्षकांच्या पॅनेलने शिक्षकांशी चर्चा केली, वर्गात अनुभवात्मक अध्यापन पद्धतींचा वापर करण्यासाठी त्यांचे कौतुक केले. शिक्षकांनी कथाकथन, समीक्षात्मक विचारसरणी, वास्तविक जीवनातील अनुभव, परस्परसंवादी खेळ अशा विविध पद्धतींच्या माध्यमातून शिक्षण कसे मजेदार बनवतात याबद्दल प्रेरणादायी गाथा सांगितल्या, ज्यामुळे प्रत्येक तरुण आणि जिज्ञासू विद्याथ जीवनात भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम होईल.

द टीचर फाऊंडेशनच्या संस्थापकीय संचालिका श्रीमती माया मेनन; द टायटन स्कूल, होसूरच्या अकॅडेमिक अडवायजर श्रीमती सजीता बाराती, माजी कंट्री हेड, एज्युकेशन व ऑथर-रिसर्चर डॉ. निर्मला कृष्णन, शिक्षण सल्लागार कुमारी निवेदिता मुकज हे परीक्षक होते.

रायन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रायन पिंटो यांनी सर्व शिक्षकांना एकत्र आणून सर्वोत्तम अध्यापन पद्धती सादर करण्यासाठी प्लॅटफॉर्म तयार करण्याच्या एज्युनेशन टीमच्या प्रयत्नांचे कौतुक केले. पुढील रोडमॅपबद्दल सांगताना ते म्हणाले, "कृत्रिम बुद्धिमत्ता लोकप्रिय संकल्पना असली तरी तंत्रज्ञान नेहमीच आव्हानात्मक राहिले आहे आणि शिक्षक व शिक्षण उद्योजक म्हणून आम्हाला आमच्या मर्यादांना दूर करण्यास प्रेरित करत राहिले आहे. आपल्यासमोरील प्रत्येक आव्हान अध्यापन आणि शिक्षण प्रक्रियेत बदल घडवून आणते, विद्यार्थ्यांना त्यांची क्षमता शोधण्यासाठी, स्थिरता निर्माण करण्यासाठी आणि कुतूहलता आत्मसात करण्यासाठी प्रेरित करते. शिक्षक म्हणून आपण सतत शिकतो, आव्हानांचा सामना करतो आणि विद्यार्थ्यांच्या बदलत्या ट्रेंडशी जुळवून घेतो. आपले विद्याथ आधीच अत्याधुनिक आहेत - आपण पुढे जात राहिले पाहिजे, प्रेरित आणि कटिबद्ध राहिले पाहिजे.

त्यांनी लीड बाय एक्झाम्पलच्या फायनालिस्ट्सचे अभिनंदन केले, तसेच त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक करत म्हणाले, "चला विजेत्याची मानसिकता अंगिकारूया. आपले भाषण समाप्त करताना त्यांनी नेल्सन मंडेला यांचे शब्द सांगितले, "मी कधीच हारत नाही. मी फक्त जिंकतो किंवा शिकतो". ते पुढे म्हणाले, 'चला तर मग, एकत्र येऊन उज्ज्वल भविष्य घडवूया.

शिक्षकांचे मार्गदर्शन करत प्रमुख अतिथी द टीचर फाऊंडेशनच्या संस्थापकीय संचालिका श्रीमती माया मेनन म्हणाल्या, "अध्यापन हा प्रतिबिंब व विकासाचा सातत्यपूर्ण प्रवास आहे. आपण विद्यार्थ्यांचे अधिक ऐकले पाहिजे, कारण त्यांच्या मतांमधून अध्ययनाचा खरा प्रभाव निदर्शनास येतो. शिक्षकांचे अध्यापन साध्य केलेल्या गोष्टी, साध्य न झालेल्या गोष्टी समजून घेण्यासोबत पाथवेचे आत्मनिरीक्षण करण्याइतकेच महत्त्वाचे आहे. शिक्षकांसाठी लीड बाय एक्झाम्पल सारखे फोरम्स शाळांमध्ये सर्वोत्तम अध्यापन पद्धती राबवण्याचे उत्तम मार्ग आहेत. शिक्षक समुदायामध्ये सहयोगाची भावना जागृत करत शिक्षकांसाठी सहयोगाने शिकण्याचा आणि एकमेकांच्या सर्वोत्तम अध्यापन पद्धतींची देवाणघेवाण करण्याचा हा सर्वोत्तम मार्ग आहे.

रायन एज्युनेशनचे सीओओ श्री. विनोद शर्मा, रायन एज्युनेशनच्या अकॅडेमिक हेड श्रीमती निधी थापर आणि देशभरातील शाळांचे मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका या इव्हेण्टदरम्यान उपस्थित होते.

### विजेते पुढीलप्रमाणे

**पूर्व-प्राथमिक विभाग: एचडीएफसी स्कूलमधील नीलिमा कौर विजेत्या ठरल्या आणि रायन इंटरनॅशनल अकॅडमी, हिंजवडीच्या शिवानी मुनशी उपविजेत्या ठरल्या.**
**प्राथमिक विभाग: अमनोरा स्कूल, पुणेमधील रिचर्ड मेंडिस आणि कौसर खान हे अनुक्रमे विजेते व उपविजेते ठरले.**
**माध्यमिक शाळा विभाग: सर्जापूर शाखेमधील मिनी रेगिन यांनी पहिले स्थान पटकावले आणि हिंजवडी शाखेमधील संकालिता मजुमदार यांनी दुसरे स्थान पटकावले.**
**उच्च माध्यमिक शाळा विभाग: अमनोरामधील शिवानी कुलकण यांनी पहिले स्थान पटकावले आणि तत्त्व स्कूल, बेंगळुरूमधील निधी जैन यांनी दुसरे स्थान पटकावले.**
**अमनोरा स्कूल, पुणे चॅम्पियन ठरली आणि रायन इंटरनॅशनल अकॅडमी, हिंजवडी, पुणे उपविजेती ठरली, यामधून या शाळांमधील शिक्षकांची समर्पितता व कौशल्ये दिसून येतात. रायन एज्युनेशनच्या 11 शाळांमधील 50 हून अधिक सहभागी शिक्षकांनी या इव्हेण्टमध्ये सहभाग घेत त्यांच्या अद्वितीय अध्यापन पद्धतींना अधिक निपुण केले.**

## थोडक्यात



### केएमपी ॲस्पायर एफसीने जिंकली राज्य युथ लीग

**पुणे (आरंभ पर्व) : केएमपी ॲस्पायर एफसीने महाराष्ट्र राज्य युथ लीगमध्ये १५ वर्षांखालील (साखळी फेरी) मुलींमध्ये विजेतेपद पटकाविले. या जेतेपदासह ते सुपर फोर फेरीसाठी पात्र ठरले आहेत. वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (विफा) आयोजित सिंहगड स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, लोणावळा येथे झालेल्या फुटबॉल लीगमध्ये साखळी फेरीतील जेतेपदामुळे ॲस्पायर एफसी टीम सुपर फोर फेरीसाठी (टॉप-4 संघ) पात्र ठरली आहे. सुपर फोर फेरी मार्च महिन्यामध्ये लोणावळा येथेच होणार आहे. केएमपी ॲस्पायर एफसीने 7 संघांच्या लीगमध्ये 15 गुणांसह अव्वल स्थान पटकावले. ही स्पर्धा ऑल-प्ले-ऑल फॉरमॅटमध्ये 35 मिनिटांच्या दोन सत्रात (हाफ) खेळविण्यात आली. संपूर्ण लीगनंतर, ॲस्पायर एफसी आणि यंग मास्टर्स कम्युनिटी क्लब (वायएमसीसी), पालघर यांच्यात (15 गुण; 5 विजय आणि 1 पराभव) बरोबरी राहिली. तथापि, दोन्ही संघांची हेड टू हेड कामगिरी ॲस्पायर एफसीसाठी जमेची बाजू ठरली. त्यांनी (22 गोल केले तर 2 गोल स्वीकारले) वायएमसीसीला (22 गोल केले तर 4 गोल स्वीकारले) गोल फरकामध्ये मागे टाकताना अव्वल स्थानावर शिक्कामोर्तब केले. ॲस्पायर एफसीची सांघिक कामगिरी उंचावण्यात इप्सिता गवारी आणि शर्वरी माने (प्रत्येकी ६ गोल), अनुश्री देवळालीकर, थीया फर्नांडिस (प्रत्येकी ३ गोल), समीक्षा साबळे (२ गोल) आणि मिश्का अरुण (१ गोल) यांचे योगदान मोलाचे ठरले.**

### होम क्रेडिट इंडिया भारताच्या आकांक्षा पुढे नेण्यासाठी मदत करत आहे

HOME CREDIT
Now you can

**पुणे (आरंभ पर्व) : ऑन-डिमांड म्हणजेच मागणीनुसार उपलब्ध आर्थिक सेवांनी सोयीसुविधा नव्याने परिभाषित केली आहे. यामध्ये त्यांनी ग्राहकांना योग्य आर्थिक निर्णय घेण्यासाठी सशक्त करणारे शिस्तबद्ध आर्थिक व्यवहार आणि ग्राहकांच्या विशेष आवश्यकतेनुसार बनवलेल्या सेवा आणल्या आहेत. या प्रगतिशील परिवर्तनाच्या मुळाशी ग्राहकांच्या गरजांचे असे एक सूक्ष्म व सखोल आकलन आहे, ज्यामध्ये लहान-लहान परंतु महत्त्वाच्या मुद्द्यांचा विचार करण्यात आला आहे. त्यामुळे आर्थिक सोयीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा, याची व्यवस्थित व संतुलित समज प्राप्त झाली आहे. होम क्रेडिट इंडिया या परिवर्तनामध्ये आघाडीवर आहे. होम क्रेडिट इंडिया ही कंपनी आपल्या ग्राहकांना वेगवान, सहज-सोपी, भविष्याचा अंदाज देणारे अनुभव देते आणि त्यांची मुळे विश्वासावर आधारित आहेत.**



## मुलाच्या स्मरणार्थ १ लाखांची देणगी

**शिरोली (दै. आरंभ पर्व)**
इंदोरी-सुदवडी (ता. मावळ) येथील भंडारा डोंगरावर नियोजित जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या होत असलेल्या मंदिराचे बांधकामासाठी कुरुळी (ता.खेड) येथील माजी ग्रामपंचायत सदस्य धर्माजी काशिनाथ मेमाणे यांनी आपल्या स्व.आदित्य मेमाणे या मुलाचे स्मरणार्थ १ लाख रुपयांची देणगी दिली आहे.

धर्माजी मेमाणे यांचे पुजा मुलीचे लग्न नुकतेच भंडारा लॉन्स मंगल कार्यालयात पार पडले.धार्मिक कार्याची आवड असल्याने धर्माजी मेमाणे यांनी आपल्या आदित्य मुलाचे स्मरणार्थ भंडारा डोंगरावर नियोजित जगतगुरू संत तुकाराम महाराजांचे मंदिर बांधकामासाठी एक लाख रुपये देण्याचा निर्णय घेऊन मुलीच्या लग्न सोहळ्यासाठी उपस्थित मान्यवरांचे हस्ते लाखाचा धनादेश श्री विठ्ठल रुखमाई तुकाराम महाराज भंडारा डोंगर ट्रस्ट पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला.

संत तुकाराम महाराज मंदिर बांधकामासाठी एक लाखाचा धनादेश देताना ट्रस्टचे प्रमुख जगन्नाथ नाटक पाटील भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे,भाजपचे जिल्हाध्यक्ष शरद बुट्टे पाटील,भाजपा युवामोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष काळुराम पिंजन,कैलास गाळव,तालुका उपाध्यक्ष सुनिल देवकर,जोपाशेठ पवार व अखिल भारतीय वारकरी मंडळाचे सचिव संदीप बोत्रे, सरपंच राजू झांबरे,प्रकाश दोंद,धर्माजी मेमाणे सुरेश काळे, रामदास काळे,संतोष कडूसकर,रामभाऊ कराळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## शिव विचार आचरणात आणणे ही काळाची गरज : राजेंद्र शिनारे

### स्वानंद प्राथमिक विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी

**धायरी (दै. आरंभ पर्व)**
छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार हे प्रत्येकांना आत्मसात करायला हवे हीच खरी शिवजयंती असेल असे आवाहन शिवव्याख्याते राजेंद्र शिनारे यांनी केले.



स्वानंद प्राथमिक विद्यालय येथे शिवजयंती 'जल्लोषात व उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे शिवव्याख्याते व निवेदक श्री. राजेंद्र शिनारे यांचे व्याख्यान पार पडले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रशांत मनोरे, दादासाहेब मनोरे प्रबोधिनीचे उपाध्यक्ष विलास नऱ्हे, सचिव संतोष पवार, मुख्याध्यापिका डॉ. श्रुती मनोरे, शिक्षक प्रतिनिधी वंदना कदम, पालक शिक्षक संघाच्या सदस्या दामिनी कसबे, रेणुका तायनाथ, नंदा धोत्रे यांच्या उपस्थितीत बाल शिवबा, माता जिजाऊ, बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालुसरे यांचे ढोलताशाच्या गजरात व शिवगर्जनेने भव्य आगमन झाले.

या कार्यक्रमात वार्षिक क्रीडा स्पर्धा व विविध गुणदर्शन स्पर्धामध्ये प्रविण्य मिळविलेल्या विदयार्थ्यांचा प्रशस्तीपत्रके देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी पाळणा, शिवगीते, पोवाडा, गायन व नृत्य असे विविध कलागुण सादर केले. यात पालकांनीही सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे शिवव्याख्याते राजेंद्र शिनारे यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांची धर्माप्रती असणारी निष्ठा व प्रेम कसे होते याची माहिती दिली. तसेच, शिवजयंती साजरी करण्याचा मूळ उद्देश म्हणजे शिवरायांचे विचार आपल्या अंगी बाणणे, आचरणात आणणे हा आहे हे स्पष्ट केले. आजच्या मातांनी आपल्या मुलांना माता जिजाऊने केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणेच शिकवावे व मुलांना शिवचरित्र वाचायला सांगावे अशी माहिती दिली. त्यांच्या व्याख्यानाने विद्यालयाचा परिसर दणाणला. पालक, विद्यार्थी, शिक्षक मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमास विद्यार्थी व पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार सहशिक्षिका दीपाली बिबवे यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त

## रक्तदान शिबिर व मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

- **निर्मला घुले प्रतिष्ठान व न्यू आर्या फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उपक्रम**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
नांदेड सिटी येथील एम्फीथेटर येथे न्यू आर्या फाउंडेशन, निर्मला घुले फाउंडेशन, संस्कार चॅरिटेबल ट्रस्ट आणि श्री आरोग्य लक्ष्मी आयुर्वेद क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबीर व मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले.




दरवर्षी शिवजयंतीच्या निमित्ताने हा उपक्रम राबवण्यात येतो. यंदा हे चौथे वर्ष आहे. या शिबिरामध्ये १२५ नागरिकांनी रक्तदाब केले तसेच १२३ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली, यामध्ये संधिवात ,ब्लड शुगर, नेत्र तपासणी, फुल बॉडी चेकअप, यासारखे तपासण्या करण्यात आल्या. नांदेड सिटी व परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी करत उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. शिवजयंतीच्या निमित्ताने राबवलेल्या या उपक्रमाबद्दल नागरिकांनी कौतुक व्यक्त केले. कार्यक्रमाला खडकवासला भाजपा प्रभाग अध्यक्ष रुपेशजी घुले पाटील, न्यू आर्या फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्ष संतोषजी कदम, खडकवासला भाजपा महिला अध्यक्ष रश्मी घुले पाटील, भाजप व सरचिटणीस जोशी, स्वप्निल कारले विकास देंडगे, शंकर इंगवले कृष्णकांत घोटेकर, हर्षद घुले राम बेंद्रे, काशिनाथ मते, नाना देशमुख , सौ.सुप्रिया करमकर आदी उपस्थित होते. धायरी, रायकर मळा येथील व्यंकटसाई होंडाचे विशेष सहकार्य लाभले.




## राजगुरू महाविद्यालयाची भिलार या पुस्तकांच्या गावाला भेट

**किरण खुडे**

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**
येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी, भूगोल आणि इंग्रजी विभागाच्या सुमारे १२० विद्यार्थ्यांनी महाबळेश्वर जवळील भिलार या देशातील पहिल्या पुस्तकांच्या गावाला शैक्षणिक भेट देऊन वाचनाचा आनंद घेतला.

राज्य सरकारचा मराठी भाषा विभाग आणि राज्य मराठी विकास संस्था यांच्यातर्फे पर्यटकांना मराठी भाषेची संस्कृती कळावी व वाचनसंस्कृती विकसित करण्याच्या उद्देशातून साकारण्यात आलेल्या भिलार गावात ३५ घरांची निवड करून तेथे छोटी ग्रंथालये उभारण्यात आली आहेत. तेथे विविध साहित्य प्रकारातील ४० हजारांहून अधिक पुस्तके ठेवण्यात आली आहेत. ही पुस्तके पर्यटक वाचकांना मोफत वाचण्याची सुविधा आहे.

# चाकण भागातील बहुळ गावात मध्यरात्री दरोडेखोरांचा धुमाकूळ : सशस्त्र दरोडा

### प्रतिकार करणाऱ्या दापत्याला चाकूने भोसकले

**चाकण (दै. आरंभ पर्व)**
खेड तालुक्यातील बहुळ गावात मध्यरात्री दरोडेखोरांनी धुमाकूळ घालून एका कुटुंबाला चाकूच्या धाकावर ओलीस धरले. वृद्धांना धमकावून दागिने आणि रोकड लुटल्यानंतर, तरुण दाम्पत्याने प्रतिकार करताच चोरट्यांनी त्यांच्यावर थेट चाकूने जीवघेणा हल्ला चढवला. या घटनेमुळे संपूर्ण गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

जयराम लक्ष्मण वाडेकर (वय 67) हे आपल्या कुटुंबासोबत बहुळ गावातील फुलसुंदर वस्ती येथे राहतात. त्यांच्या कुटुंबात पत्नी शालन (वय 65), मुलगा अशोक (वय 35), सून उज्वला (वय 32) आणि दोन लहान नातवंडे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. 23) अशोक आणि उज्वला हे शिवनेरी येथे दर्शनासाठी गेले होते. रात्री 10 वाजण्याच्या सुमारास ते घरी परतल्यानंतर कुटुंब जेवण करून झोपले. मध्यरात्री अचानक पाच-सहा चोरट्यांनी घराचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला. झोपलेल्या जयराम वाडेकर यांना अचानक पत्र्याच्या पेटीचा आवाज आल्याने जाग आली. त्यांनी पाहिले असता, 20 ते 25 वयोगटातील एक दरोडेखोर हातात चाकू घेऊन त्यांच्याजवळ बसला होता. "गप्प राहा, नाहीतर चाकू




भोसकतो!" अशी धमकी दिली. चोरट्यांनी शालन वाडेकर यांच्या अंगावरील दागिने हिसकावले.

जयराम आणि शालन यांच्या अंगावरील दागिने काढून घेतल्यावर त्यांनी आपला मोर्चा अशोक आणि उज्वला यांच्या बेडरूमकडे वळविला. त्यांच्याही बेडरूमचा दरवाजा तोडत आत प्रवेश केला. आवाजामुळे अशोक आणि उज्वला यांना जाग आली. त्यांनी दरोडेखोरांना प्रतिकार करताच, चोरट्यांनी दोघांच्या पोटात थेट चाकू भोसकला, रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या दाम्पत्याने मदतीसाठी आरडाओरड केली. त्यावेळी शालन वाडेकर यांनी मुलाला व सूनेला वाचवण्यासाठी धाव घेतली, मात्र, चोरट्यांपैकी एकाने त्यांना काठीने मारहाण केली.

यामध्ये चोरट्यांनी 1 लाख 32 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि 12 हजार रुपये रोख रक्कम लंपास केली आहे.

हल्ल्यानंतर चोरटे पळून गेले. जाताना त्यांनी घराची बाहेरून कडी लावून घेतली.

या धक्कादायक घटनेनंतर संपूर्ण गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच चाकण पोलिसांसह पिंपरी- चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली आहे. दरोडेखोरांच्या शोधासाठी विविध पथके रवाना करण्यात आली आहेत.

# पती पत्नी और पडोसन : कुतूहलाचे जेव्हा ध्यासात रुपांतर होते तेव्हा काय होते?

- आता फक्त हंगामा ओटीटीवर
- राज शेट्टी दिग्दर्शित या सस्पेन्स क्राइम-थ्रिलर शोमध्ये युक्ती कपूर, मुओहित जौशी आणि चारू मेहरा मुख्य भूमिकेत आहेत




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
भारतातील आघाडीच्या डिजिटल मनोरंजन प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या हंगामा ओटीटी २० फेब्रुवारी २०२५ रोजी आणखी एक बहुप्रतिक्षित शो घेऊन आला आहे. क्राइम थ्रिलर "पती पत्नी और पडोसन" हंगामा ओटीटी घेऊन आला आहे. केवळ हंगामा ओटीटीवर प्रदर्शित होणाऱ्या या शोमध्ये रहस्य, गुन्हेगारी आणि मानसिक नाट्याचे एक मिश्रण दाखवण्यात आले आहे, ज्यामध्ये अनपेक्षित ट्विस्ट आणि टर्न आहेत जे प्रेक्षकांना शेवटपर्यंत गुंतवून ठेवतील. राज शेट्टी दिग्दर्शित, या शोमध्ये युक्ती कपूर, मुओहित जौशी आणि चारू मेहरा यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. "पती पत्नी और पडोसन" मध्ये लग्न, विश्वासघात आणि वेड यांच्यातील काळ्या, विकृत गतिशीलतेचा उलगडा होतो. हा शो प्रतिभाभोवती फिरतो, एका लहान शहरातील एक जिज्ञासू मध्यमवर्गीय गृहिणी, ज्याची भूमिका युक्ती कपूरने साकारली केली आहे. तिच्या गूढ नवीन शेजारीण, सागरिका (चारू मेहरा) बद्दलचे तिचे आकर्षण लवकरच एका धोकादायक वेडात बदलते. सागरिकाचा भयानक भूतकाळ उलगडत असताना, प्रतिभाला तिच्या पती (मुओहित जौशी) ला या रहस्यमय अनोळखी व्यक्तीच्या घातक हेतूंना बळी पडण्यापासून वाचवण्यासाठी फसवणुकीच्या जाळ्यात अडकावे लागते. सहा भागांमध्ये असलेली ही मालिका थ्रिलर आणि सस्पेन्सने पूरेपुर भरलेली आहे.

हंगामा डिजिटल मीडियाचे सीईओ सिद्धार्थ रॉय या शोबद्दल बोलताना म्हणाले, "पती पत्नी और पडोसन च्या माध्यमातून,आम्ही एक क्राईम थ्रिलर घेऊन येत आहोत ह्याचा आम्हाला आनंद होत आहे जो सस्पेन्स, क्राइम आणि ड्रामा ह्यात उत्कृष्टपणे विणला (बांधला) गेला आहे . एक चांगला नेहमी लक्षात राहणारा कंटेंट प्रेक्षकांना देणे हेच आमचे उद्दिष्टे आहे आणि आम्ही आमच्या निष्ठावान दर्शकांसोबत ही आकर्षक कथा शेअर करण्यास उत्सुक आहोत."

प्रतिभाची भूमिका साकारणाऱ्या युक्ती कपूर त्यांच्या भूमिकेबद्दल बोलताना म्हणाल्या आहेत की, "प्रतिभा ही मी यापूर्वी साकारलेल्या इतर कोणत्याही भूमिकेपेक्षा वेगळी आहे त्यामुळे याचा मला भविष्यात नक्कीच फायदा होईल. कुतूहलापासून ते वेडापर्यंतचा तिचा प्रवास थरारक आहे.कथानकातील ट्विस्ट प्रेक्षकांना नक्कीच गुंतवून ठेवण्यास मदत करतील."

रहस्यमय सागरिकाची भूमिका साकारणाऱ्या चारू मेहरा या म्हणाल्या, "सागरिका ही एक गुंतागुंतीची व्यक्तिरेखा आहे जिचा भूतकाळ भयावह आहे. शोमध्ये तिची भूमिका जिवंत करणे हे माझ्यासाठी आव्हानात्मक होते आणि ते मी पूर्ण केल्याचे एक कलाकार म्हणून मला समाधान आहे. यात मानवी स्वभावाच्या विविध छटा दाखवल्या आहेत आणि मला विश्वास आहे की हा शो सहाही भागांमध्ये प्रेक्षकांना पूर्णपणे खिळवून ठेवेल."

मुओहित जौशी म्हणाले, "पति पत्नी और पडोसन हा नाते, विश्वास आणि फसवणूक यांचा एक अनोखा अनुभव घेऊन येतो. भावनिक गुंतागूंत आणि रहस्यमय क्षण याला एक गुन्हेगारी थ्रिलर बनवतात. माझ्या व्यक्तिरेखेचे आयुष्य ज्याप्रकारे त्याच्या पत्नीच्या वेड्यात आणि त्याच्या शेजाऱ्याच्या दुष्टपण्यात अडकले आहे त्यामुळे त्याचा प्रवास खूपच मनोरंजक बनतो."

भावनिक गुंतागूत असलेला, 'पती पत्नी और पडोसन' हा सस्पेन्सने भरलेला शो फक्त हंगामा ओटीटीवर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सर्व भाग पाहण्यासाठी आजच हंगामा ॲप डाउनलोड करा. ही मालिका टाटा प्ले बिंज, वॉचो, बीएसएनएल, प्लेबॉक्सटीव्ही, रेलवायर ब्रॉडबँड, एअरटेल एक्सस्ट्रीम प्ले आणि डोर टीव्ही यासारख्या भागीदार प्लॅटफॉर्मवर देखील उपलब्ध आहे.

# थोडक्यात



## प्रयत्नांची पराकाष्ठा, सकारात्मक दृष्टीने यशप्राप्ती : डॉ. दत्ता कोहिनकर

**पुणे (आरंभ पर्व) :** "प्रयत्नांची पराकाष्ठा, मनातील जिद्द आणि सकारात्मक दृष्टी तुम्हाला यशाच्या मार्गावर घेऊन जाते. जीवनात येणाऱ्या संकटाना आत्मविश्वासाने सामोरे जात प्रामाणिक प्रयत्न केल्यास हमखास यश मिळते," असे मत माईंड पॉवर ट्रेनर व लेखक डॉ. दत्ता कोहिनकर यांनी व्यक्त केले. एनेबलर चॅरिटेबल ट्रस्ट आणि 'सक्षम'च्या वतीने प्रथमच व्हीलचेअरवरील दिव्यांग महिला व पुरुष यांच्यासाठी 'व्हीलचेअर रेस'चे आयोजन केले होते. एस. पी. कॉलेजच्या मैदानावर या स्पर्धा झाल्या. एकूण १०० दिव्यांग बंधू-भगिनींनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धा चार गटात झाल्या. स्पर्धक, पालक मिळून २५० जण उपस्थित होते. स्पर्धेचे संपूर्ण आयोजन सीमा दाबके, अमोल शिनगारे, अशोक बोत्रे, संतोष गायकवाड, अभिजित पोवार, निलेश कांबळे, रामा चलवादी, प्रकाश शेलार, अनंत माखे, कासीम शेख, सोहेल मुलानी यांनी केले. अशोक नांगरे, रवींद्र जोशी, प्रशांत पडदे, सेवा चव्हाण, आकाश कासूर्डे यांनी पंच म्हणून काम केले. 'एमआयटी'च्या नेकी क्लबचे सभासदांनी स्वयंसेवक म्हणून काम केले.




## छत्रपती शिवाजीराजांचे आचार व विचार आत्मसात करावेत : कांबळे

**पुणे (आरंभ पर्व) :** "छत्रपती शिवाजी महाराजांचे आचरण, त्यांचे ओजस्वी विचार आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत. चांगल्या समाजासाठी महाराजांचे हे आचार व विचार प्रत्येकाने आत्मसात करावेत," असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्ष समितीचे अध्यक्ष शशिकांत कांबळे यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडण्यासाठी अशा स्पर्धा उपयुक्त ठरतात, असेही कांबळे यांनी नमूद केले. खानापूर येथील पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या महात्मा गांधी विद्यालयात शिवजयंतीनिमित्त आयोजित निबंध स्पर्धेच्या बक्षीस वितरणावेळी कांबळे बोलत होते. विजेत्यांना रोख बक्षीस व स्कुल बॅग देण्यात आले. प्रसंगी पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य नवनाथ पारगे, माजी सरपंच लक्ष्मण माताळे, शिवसेना नेते संतोष शेलार, तंटामुक्ती अध्यक्ष शरद पारगे, माजी उपसरपंच शुभांगी खिरीड, राष्ट्रवादी नेते शशिकांत किवळे, कैलास मोरे, तेजश्री डिंबळे, महेश दिवार, विकी भालेराव, वैभव म्हसगुडे, प्रसाद पायघन, विद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग फापाळे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महा महाशिवरात्री जागतिक योगी दिनाचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
प्राचीन आध्यात्मिक परंपरा आणि दुर्मिळ खगोलीय घटनांच्या उल्लेखनीय संगमाचा अनुभव घेत, जगभरातील लाखो साधक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी महामहाशिवरात्री २०२५ साजरी करण्यासाठी एकत्र येणार आहेत. भारतामध्ये प्रयागराज येथे होत असलेल्या महा कुंभमेळ्याच्या काळात महाशिवरात्र आली आहे. या जागतिक आध्यात्मिक पर्वाच्या निमित्ताने नंदीजी महा महाशिवरात्री जागतिक योगी दिनाचे आयोजन करणार आहेत. ही एक तल्लीन करणारी व्हर्च्युअल आंतरिक तीर्थयात्रा आहे जी चेतना उन्नत करण्यासाठी, नेतृत्व क्षमता खुल्या करण्यासाठी आणि उच्च जागरूकतेच्या शक्तीचा वापर करण्यासाठी डिझाइन केलेली आहे.

जागतिक योगी दिन महाशिवरात्री आणि जागतिक ज्ञानाला चालना देणारे जागरूक सामाजिक व्यासपीठ सीएनईएसएसचे संस्थापक नंदीजी म्हणाले, "१४४ वर्षांतून एकदा होणाऱ्या अवकाशीय घटनांच्या या दुर्मिळ संगमाचे महत्त्व महाकुंभमेळ्यामुळे वृद्धिंगत झाले आहे, ज्याठिकाणी ६० कोटींपेक्षा जास्त प्रार्थना गुरु ग्रहाच्या १२ वर्षांच्या कक्षेत एकत्र येतात आणि त्यांना गुरु म्हणून गौरवले जाते, ही चेतना आहे. या महाशिवरात्रीच्या कृपेची तीव्रता स्वतःच्या आत दीपक प्रज्वलित करून सक्रिय केली जाऊ शकते. महा कुंभमेळ्यामध्ये दिव्य नद्यांमध्ये शुद्धीकरण, नूतनीकरण आणि उपचारांप्रमाणेच आम्ही भगवान शिवसोबत एकरूप होण्यासाठी तयार आहोत. 'सैवम वेत्री', एक तामिळ वाक्य आहे, ज्याचा अर्थ आहे, 'चांगुलपणाचा विजय होतो'."

भारताचे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी जी यांनी सुरु केलेल्या आंतरराष्ट्रीय योग दिनाला जागतिक पातळीवर मिळालेली प्रसिद्धी आणि २०१४ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी स्वीकारलेल्या या निर्णयाने प्रेरित होऊन, 'महाशिवरात्री जागतिक योगी दिवस' आंतरराष्ट्रीय योग दिनाचे उद्दिष्ट - योगी, भगवान शिव म्हणून उच्च चेतनेचे सशक्तीकरण आणि प्राप्ती - साजरे करतो.

५० वर्षांहून अधिक वयाच्या बहुतेक भारतीयांना धोका असूनही

## शिंगल्स अर्थात नागिणीबाबत पुरेशी माहिती व गांभीर्य नाही

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
एका नवीन जागतिक सर्वेक्षणातून असे दिसते की ५० वर्षे वयावरील सुमारे ५६.६% भारतीय सहभागींना शिंगल्सबाबत फार कमी माहिती आहे किंवा माहिती नाही. परंतु ५० वर्षे वयावरील ९० टक्क्यांपेक्षा जास्त प्रौढांच्या शरीरात हा विषाणू आहे आणि त्यांच्या आरोग्याला धोका आहे. 1, , जागतिक स्तरावर फक्त ४४% लोकांना शिंगल्सबाबत थोडी माहिती आहे. 1 शिंगल्स जागरूकता सप्ताहाच्या प्रारंभी (२४ फेब्रुवारी- २ मार्च २०२५) आयोजित केलेल्या या सर्वेक्षणातील निष्कर्षातून वयाशी संबंधित आरोग्याच्या धोक्यांबाबत, विशेषतः आधीच आरोग्याच्या समस्या असलेल्या व्यक्तींमध्ये मर्यादित जागरूकता असल्याचे अधोरेखित झाले आहे. भारतात सुमारे ६१% प्रतिसादकांनी मधुमेह, सीओपीडी, दमा, कार्डिओव्हॅस्क्युलर आजार किंवा गंभीर मूत्रपिंडाचे आजार असल्याचे नमूद केले आहे. तथापि फक्त ४९.८% लोकांनी शिंगल्स होण्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. जागतिक स्तरावर सुमारे ५४% सहभागींना गंभीर आजार होते. परंतु फक्त १३% लोकांनी शिंगल्सबाबत चिंता व्यक्त केली. जीएसके इंडियाच्या वैद्यकीय संचालक डॉ. शालिनी मेनन म्हणाल्या की, "आपले वय वाढते तसे रोगांची लढण्याची आपली नैसर्गिक क्षमता कमी होते. त्यामुळे आपण शिंगल्ससारख्या विविध रोगांना जास्त बळी पडू शकतो. वाढते वय आणि गंभीर आजार एकत्र आले की, हा धोका वाढतो. असे असले तरी ५० वर्षे वयावरील लोकांना या धोक्यांची माहिती नसते असे या सर्वेक्षणातून दिसून आले आहे आणि ही चिंतेची बाब आहे.1 वय वाढणाऱ्या लोकांनी आरोग्यावरील वृद्धत्वाचा परिणाम जाणून घेणे आणि हे धोके ओळखून प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अंगीकार करणे महत्त्वाचे आहे. यात सकस आहार घेणे, नियमित व्यायाम करणे, लक्षणे लवकर ओळखणे, वेळेत आरोग्याची तपासणी करून घेणे आणि आपल्या आरोग्यसेवा पुरवठादारांसोबत लसीकरणाचे पर्याय जाणून घेणे अशा गोष्टी समाविष्ट आहेत. लवकर जागरूक होणे आणि सकारात्मक पावले उचलल्याने आपण आपल्या वयोवृद्ध होणाऱ्या लोकसंख्येसाठी दीर्घकालीन आरोग्यात सुधारणा करू शकतो." या सर्वेक्षणातून ५० वर्षे आणि त्यावरील भारतीयांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता व वर्तनात मोठी तफावत असल्याचे दिसून आले आहे.1 या वयोगटातील अर्ध्यापेक्षा जास्त (५६%) प्रतिसादक स्वतःला प्रत्यक्ष वयापेक्षा जास्त तरूण समजतात. त्यातील २४ टक्के लोक दहा वर्षे लहान असल्याचे समजतात तर फक्त २५ टक्के लोकांना वयाशी संबंधित रोगांबाबत जागरूकता आहे आणि ते प्रभाव कमी करण्यासाठी सकारात्मक पावले उचलतात.1 आपले आरोग्य चांगले आहे असे वाटणे आणि प्रत्यक्ष आरोग्य व्यवस्थापनातील ही दरी चिंताजनक ट्रेंड अधोरेखित करते कारण सकारात्मक काळजीच्या अभावामुळे वयाशी संबंधित धोके आणि शिंगल्ससारख्या संसर्गजन्य आजारांचे प्रमाण वाढते. सुदृढ वयोवृद्धत्व सवयींबाबत अधिक जागरूकता आणि कृती यांची तात्काळ गरज असल्याचे यातून दिसते. दि इंटरनॅशनल फेडरेशन ऑन एजिंग (आयएफए)नेही ५० वर्षे आणि त्यावरील लोकांनी आपली प्रकृती व आरोग्यावर जास्त लक्ष देणे आवश्यक असल्याचे मत मांडले आहे कारण त्यांची प्रतिकारशक्ती वयानुसार आपोआप कमी होत जाते.

## ॲपल टीव्ही+ आणि ॲपल म्युझिक प्रदान करणार आहे

- आता सर्व होम वाय-फाय ग्राहकांसाठी रु. 999 पासून सुरु होणाऱ्या प्रशुल्कांवर ॲपल टीव्ही+ उपलब्ध आहे
- रु. 999 पेक्षा मोठा प्लॅन घेतलेल्या सर्व पोस्टपेड ग्राहकांना आता ॲपल टीव्ही+ पाहता येणार आहे आणि ॲपल म्युझिकचा आनंद 6 महिन्यांसाठी विनामूल्य उपभोगता येणार आहे

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**
भारती एअरटेल आणि ॲपल यांनी एक धोरणात्मक भागीदारी केली आहे आणि एअरटेल ग्राहकांसाठी अतिशय कौतुक केल्या गेलेल्या ॲपल टीव्ही + स्ट्रीमिंग सेवा आणि ॲपल म्युझिक सादर करीत आहेत. रु. 999 पासून सुरू होणारे प्लॅन्स घेतलेल्या सर्व होम वाय-फाय ग्राहकांना ॲपल टीव्ही+ चे आकर्षक विषय पाहता येणार आहेत आणि फिरतीवर असताना अनेक डिव्हाइसेस वर विषय स्ट्रीम करण्याचा पर्याय मिळणार आहे. याशिवाय, रु. 999 पासून सुरू होणारे प्लॅन्स घेतलेल्या पोस्टपेड ग्राहकांना ॲपल टीव्ही+ पाहता येणार आहे आणि भारतीय व जागतिक संगीताचा मोठा कॅटलॉग असलेल्या ॲपल म्युझिकचा आनंद 6 महिन्यांसाठी विनामूल्य उपभोगता येणार आहे.

ॲपल सोबतच्या या धोरणात्मक भागीदारीमुळे एअरटेल ग्राहकांना खास प्रीमियम, पहायला आकर्षक नाटक (ड्रामा) आणि विनोदी मालिका (कॉमेडी सीरिज), कथाचित्रपट (फीचर फिल्म्स), अभूतपूर्व माहितीपट (डॉक्युमेंटरी) आणि मुलांचे व कौटुंबिक मनोरंजन पहायला मिळणार आहे. याव्यशिवाय, ॲपल म्युझिकची इंग्रजी, हिंदी आणि इतर अनेक भाषांमध्ये अजोड लायब्ररी एक अद्वितीय ऑडिओ अनुभव सुनिश्चित करते.

सिद्धार्थ शर्मा- चीफ मार्केटिंग ऑफिसर आणि सीईओ - कनेक्टेड होम्स, भारती एअरटेल म्हणाले की, "आमच्या ग्राहकांसाठी खास करून त्यांचे अतिशय कौतुक केले गेलेले व्हिडिओ आणि संगीत विषय सादर करून आम्ही अगदी उत्सुकतेने ॲपलसोबत कायापालट करून टाकणारी भागीदारी जाहीर करीत आहोत. हा सहयोग आमच्या लाखो होम वाय-फाय आणि पोस्टपेड ग्राहकांना एक विलक्षण संधी उपलब्ध करून देत आहे आणि यामुळे त्यांना ॲपलच्या प्रीमियम विषयाचा कॅटलॉग उपलब्ध होणार आहे. आम्हाला खात्री आहे की ही भागीदारी विषय पाहण्याचे भूदृश्य नव्याने निश्चित करेल आणि ग्राहकांमध्ये मनोरंजन अनुभवांसाठी एक नवीन मानक स्थापित करेल. आम्ही मिळून आमच्या बहुमूल्य ग्राहकांसाठी प्रीमियम मनोरंजन परिसंस्था प्रदान करण्याचे उद्दीष्ट ठेवलेले आहे."

शालिनी पोद्दार, संचालिका, कंटेंट अँड सर्व्हिसेस, ॲपल इंडिया म्हणाल्या, "आम्ही उत्सुकतेने लाखो वापरकर्त्यांपर्यंत सर्वोत्कृष्ट संगीत सेवा, प्रीमियम टीव्ही मालिका आणि चित्रपट पोहोचविण्यासाठी एअरटेल सोबत भागीदारी केली आहे आणि त्यायोगे भारतभरातील प्रेक्षकांसाठी नव्याने शक्यता निश्चित करीत आहोत. या भागीदारीत प्रत्येकासाठी काहीतरी सादर केले जात असून ती पुरस्कार प्राप्त विषय, कथा आणि मनोरंजन सुलभपणे उपलब्ध करण्याच्या आमच्या धोरणात्मक ध्येयाशी सुसंगत आहे."

या भागीदारीसह, ग्राहकांना सर्व ॲपल टीव्ही+ च्या मूळ मालिका आणि चित्रपट जाहिरात मुक्त पाहण्याचा आनंद उचलता येणार आहे आणि त्यात 'टेड लासो', 'सेव्हरेन्स', 'द मॉर्निंग शो', 'स्लो हॉर्स', 'सायलो' आणि 'डिस्क्लेमर' यांसारख्या जागतिक पुरस्कार विजेत्या हिट मालिका तसेच 'वुल्फ्स' आणि 'द गॉर्ज' यांसारखे ताजे चित्रपट सामील आहेत. याशिवाय, ग्राहकांना पुरस्कार विजेते ॲपल म्युझिक 6 महिने विनामूल्य उपलभ असेल, जो भारतीय आणि जागतिक संगीताचा सर्वात मोठा संग्रह आहे, तज्ञरीतीने तयार केलेल्या प्लेलिस्ट, कलाकारांच्या मुलाखती, ॲपल म्युझिक रेडिओ सोबत ॲपल म्युझिक सिंग आणि टाइम-सिंक केलेले लिरिक्स उपलब्ध होणार आहेत तसेच लॉसलेस ऑडिओ आणि तल्लीन करणाऱ्या स्पेशिअल ऑडिओ सारखी रोमांचक वैशिष्ट्ये उपलब्ध केले जाणार आहेत.

# दहशतीची किड नष्ट केली

**पारनेर (दै. आरंभ पर्व)**
खासदारकीच्या माध्यमातून जिल्ह्यात दहशतीची किड पसरली होती. ती थांबवण्याचे काम नगर-पारनेर विधानसभा मतदारसंघांतील सुज्ञ मतदारांनी केल्याने जिल्हा शांत झाला आहे. जनतेने आपल्यावर जो विश्वास टाकला आहे. त्याला तडा जाऊ न देता विकासकामे मोठ्या प्रमाणात करणार असल्याची ग्वाही आ. काशिनाथ दाते यांनी दिली.



देवीभोयरे येथे ग्रामस्थांच्या वतीने झालेल्या नागरी सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भाऊसाहेब खिलारी होते. अंबिका देवीच्या मंदीरात गावचे माजी उपसरपंच विकास सावंत व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या नवसाची नवसपूर्ती गुळतुला करुण करण्यात आली.

यावेळी भाजप नेत विश्वनाथ कोरडे, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील, माजी नगराध्यक्ष विजय औटी, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, युवा तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, युवा नेते दिलीप दाते, भाजपचे जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, भाजपचे सांस्कृतिक सेलचे तालुकाध्यक्ष विलासराव हारदे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आ. दाते म्हणाले, गेली पाच वर्षे तालुका दहशतीखाली होता. मात्र गेली ४० वर्षात आपण जे सामाजिक काम केले त्यावर विश्वास ठेऊन जनतेने दहशत मोडून काढीत निवडून दिले. त्यामुळे तालुक्यातील पाट पाण्याचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्राधान्य देणार आहे.

विधानसभेत लक्षवेधी मांडून विविध सुचना केल्याची दखल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून प्रश्न तातडीने मार्गी लागणार आहेत. कुकडी डावा कालवा व पिंपळगाव जोगा कालवा हे अस्तारीकरणाचा प्रश्न मार्गी लागला असून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष पाहाणी करीत मंजूर केला असून लवकरच हे कामे सुरू होणार आहेत.

माजी खा. डॉ सुजय विखे पाटील यांनी गेली पाच वर्षात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली आहे. ३८६ कोटी रुपयाच्या आळेफाटा-शिरुर रस्त्यासाठी निधी मंजूर केला असून लवकरच शुभारंभ होणार आहे.

माजी खा. विखे यांनी भरपूर विकासकामे केली मात्र विरोधकांनी अपप्रचार करुण जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तालुक्यातील विकासकामांसाठी आपण सातत्याने पाठपुरावा करुण विकासकामे करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. तसेच पिंपळगाव जोगा धरणाचे काम मार्गी लावण्यासाठी रविवारी अळकुटी येथे बैठक घेणार असल्याची माहिती दाते यांनी दिली.

यावेळी ज्येष्ठ नेते डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनीही आमदार दाते यांचा गौरव करीत तालुका विकासाला गती येणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी सरपंच बाबुराव मुळे, विश्वनाथ गाजरे यांनी केले.

विकासकामांची माहिती देत आमदार दाते हे विकासपुरुष असून देवीभोयरे परिसराच्या विकासासाठी आमदार दाते, विश्वनाथ कोरडे, राहुल पाटील शिंदे हे त्रिमूर्ती विकासाचे शिल्पकार ठरतील असा विश्वास व्यक्त केला. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच शिक्षक सुभाष महाराज मगर यांचा पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल गजरे यांनी केले तर माजी उपसरपंच विकास सावंत यांनी आभार मानले.

### आमदार काशिनाथ दाते कार्यक्षम नेतृत्व : कोरडे

**आमदार दाते सर हे कार्यक्षम नेतृत्व जनतेला मिळाले आहे. याचा फायदा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात होणार आहे. महायुतीच्या माध्यमातून येत्या पाच वर्षांत तालुक्यात मोठी विकास कामे होणार आहे. मात्र जनतेने होणाऱ्या ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीत महायुती आघाडी नेत्यांबरोबर राहिले पाहिजे, असे मत भाजप नेते विश्वनाथ कोरडे यांनी व्यक्त केले.**

### जनतेने महायुतीच्या पाठीमागे उभे राहावे

**अहिल्यानगर जिल्ह्यातील खासदार पुणे जिल्ह्यातील कामांची माहिती देऊन फेक न्यूज देतात. गेली पाच वर्षात फेंक करण्याचे काम त्यांनी केले त्यामुळे जनतेने त्यांना चांगला निर्णय घेऊन थांबवीण्याचे काम केले. यामुळे तालुका शांत तर झालाच आहे मात्र जिल्हा सुद्धा शांत झाला असून आत्ता खऱ्या अर्थाने तालुका विकासाला गती मिळणार असून आगामी निवडणुकीत जनतेने महायुतीच्या नेत्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहावे असे आवाहन तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांनी केले आहे.**

### महायुती सरकारचा जनतेला फायदा होणार

**कुकडी डावा कालव्याला गुरुवार (दि.२०) रोजी पाणी येणार होते मात्र आ. काशिनाथ दाते यांनी पाठपुरावा करीत हे पाणी दि.१६ रोजी आणले. आजपर्यंत कोणत्याही लोकप्रतिनिधीला हे शक्य झाले नाही ते काम दाते सर यांनी करुण दाखवले आहे. केंद्र आणी राज्य सरकार आपले आहे. राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील आहेत. याचा फायदा सातत्याने पारनेर तालुक्यातील जनतेला होत असल्याची खात्री भाजप नेते विश्वनाथ कोरडे, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे पाटील यांनी दिली.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.